महाराष्ट्र शासन

शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,परभणी

कार्यालय ईमेल पत्ता:-gmcparbhani@gmail.com आयटीआय परिसर जिंतूर रोड,परभणी कार्यालय दुरध्वनी क्रं. ०२४५२ २९९२९४

जा.क्र.शावैमप/ अस्था-१ ते २/जाहीरात/ 3174 /२०२६, दिनांक:-12/11/२०२६

:: जाहीरात ::

विषय :-वैद्यकीय शिक्षण व संशोधन,मुबंई यांच्या अधिपत्याखालील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,परभणी येथील चिकित्सालयीन व अचिकित्सालयीन विभागातील विविध विषयातील प्राध्यापक व सहयोगी प्राध्यापक व संवर्गातील रिक्त पदे मध्यवर्ती निवड प्रक्रियमार्फत करार तत्वावर तात्पुरत्या नियुक्तीने भरण्याबाबत.

संदर्भ :- १. शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्रं.संकीर्ण-२७१५/प्र.क्र.१००/१३,दि.१७/१२/२०१६

२. वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग,शासन निर्णय क्रं.एलईसी-२०२१/प्र.क्र.१९९/वैसेवा-३, दि.०९.०२.२०२२

३. वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग,शासन निर्णय क्रं.एलईसी-२०२४/प्र.क्र.१८१/वैसेवा-३, दि.२१.०८.२०२४

वैद्यकीय शिक्षण व संशोधन,मुंबई यांच्या अधिपत्याखालील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,परभणी येथील चिकित्सालयीन व अचिकित्सालयीन विभागातील विविध विषयातील प्राध्यापक व सहयोगी प्राध्यापक या संवर्गातील रिक्त असलेली पदे संस्थास्तरावरुन करार तत्वावर ३६४ दिवसांकरिता तात्पुरत्या स्वरुपात भरण्याकरिता gmcparbhani.org या संकेतस्थळावर जाहीरात प्रसिध्द करण्यात येत आहे.

तरी प्राध्यापक व सहयोगी प्राध्यापक या पदाकरिता पात्र उमेदवारांनी दिनांक १६/११/२०२६ ते दिनांक २०/११/२०२६ रोजी संध्याकाळी ५.०० वाजेपर्यंत अर्ज सादर करण्यात यावे तसेच सबंधित अर्ज केलेले उमेदवारांची शैक्षणिक कागदपत्रे पडताळणी करुन सदर पात्र/अपात्र उमेदवारांचे नावे दिनांक.२३.११.२०२६ रोजी gmcparbhani.org या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल व तसेच पात्र उमेदवारांनी दिनांक.२५/११/२०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता मुलाखती करिता आवश्यक त्या कागदपत्रासह स्वखर्चाने उपस्थित राहावे. तसेच जे उमेदवार अन्य शासकीय/खाजगी संस्थेत/वैद्यकीय महाविद्यालयात कार्यरत आहेत. त्यांनी संबंधित कार्यरत असलेल्या संस्थेकडुन कार्यमुक्त आदेश व तसेच ना-हरकत प्रमाणपत्र व नियुक्ती आदेशाच्या छायांकीत प्रती जोडाव्यात.

या संस्थेतील प्राध्यापक व सहयोगी प्राध्यापक संवर्गातील ३६४ दिवसांकरिता भरावयाच्या पदांचा तपशिल सोबत जोडलेल्या सहपत्र प्रमाणे आहे.

डॉ.विश्वजीत पवार,
अधिष्ठाता
शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,परभणी

अधिष्ठाता
शासकीय वैद्यकीय महाविद्यालय
परभणी

संस्थेचे नाव:- शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, परभणी

रिक्त पदांचा तपशील संवर्ग- प्राध्यापक

अ.क्र	विषयाचे नाव	पद संख्या	शैक्षणीक अर्हता	अनुभव
०१	शरीरक्रियाशास्त्र	०१	MD Physiology	As per the MSR norms given by NMC via notification dated ३०.०६.२०२५.
०२	औषधशास्त्र	०१	MD Pharmacolgy	
०३	औषधवैद्यकशास्त्र	०१	MD General Medicine	
०४	अस्थिव्यंगोपचारशास्त्र	०१	MS Orthopedics	
०५	स्त्रीरोग व प्रसुतीशास्त्र	०१	MS OBGY	
०६	बालरोचिकित्साशास्त्र	०१	MD Pediatrics	
०७	क्ष-किरणशास्त्र	०१	MD Radiology	
०८	त्वचा व गुप्तरोगशास्त्र	०१	MD Skin & VD	
०९	नेत्रशल्यचिकित्साशास्त्र	०१	MS Opthomology	
	एकुण पदसंख्या	०९		

संस्थेचे नाव:- शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, परभणी

रिक्त पदांचा तपशील संवर्ग- सहयोगी प्राध्यापक

अ.क्र	विषयाचे नाव	पद संख्या	शैक्षणीक अर्हता	अनुभव
०१	शल्यचिकित्साशास्त्र	०१	MS Surgery	As per the MSR norms given by NMC via notification dated ३०.०६.२०२५.
०२	औषधशास्त्र	०१	MD Pharmacology	
०३	कान नाक घसाशास्त्र	०१	MS ENT	
०४	औषधवैद्यकशास्त्र	०१	MD General Medicine	
०५	बधिरीकरणशास्त्र	०१	MD Anesthesiology	
०६	क्ष - किरणशास्त्र	०१	MD Radiology	
०७	दंतरोगशास्त्र	०१	MDS	
०८	नेत्रशल्यचिकित्साशास्त्र	०१	MS Opthomology	
०९	आपात्कालीन औषधवैद्यकशास्त्र	०१	MD Emergency Medicine	
	एकुण पदसंख्या	०९		

सदर जाहीरातील नमुद पदसंख्येत बदल करणे/सदरची जाहिरात पुर्णत: रद्द करण्याचा अधिकार निम्न स्वाक्षरीतांनी स्वत:कडे राखुन ठेवला आहे.

पुढील पानावर..

..मागील पानावरुन

महत्वाची टिप:-

१. उमेदवार हा भारताचा नागरिक व महाराष्ट्रातील रहिवासी असावा.

२. उमेदवाराचे वय नियुक्त वेळेस २५/११/२०२६ रोजी कमाल ६९ वर्षापेक्षा जास्त नसावे.

३. प्राध्यापक व सहयोगी प्राध्यापक यांना करार पध्दतीने नियुक्तीसाठी त्या त्या पदावरुन सेवानिवृत्ती झालेल्या अध्यापकांबरोबरच, राष्ट्रीय आयुर्विज्ञान आयोगाने विहीत केलेली आवश्यक अर्हता धारण करणारे खाजगी वा अन्य क्षेत्रातील उमेदवार (बिगर सेवानिवृत्त) पात्र असतील.

४. मानधन:

अ. सेवानिवृत्त अध्यापकांची करार पध्दतीने नियुक्ती झाल्यास त्यांना शासन निर्णय दिनांक.१७.१२.२०१६ मधील तरतुदीनुसार दरमहा मानधन अनुदेय राहील.

ब. खाजगी वा अन्य क्षेत्रातील उमेदवार (बिगर सेवानिवृत्त) यांना खालील नमुदप्रमाणे दरमहा मानधन अनुज्ञेय असेल.

अ.क्र	पद	दरमहा मानधन
०१	प्राध्यापक	रु. १८५०००/-
०२	सहयोगी प्राध्यापक	रु. १७०००००/-

नियम व अटी-

१. करार पध्दतीने नियुक्तीचा कालावधी हा नियमित उमेदवार उपलब्ध होईपर्यंत अथवा ३६४ दिवसांचा कालावधी यापैकी जे अगोदर घडेल इतका राहील.तथापी सदरहु पदावर नियमित उमेदवार उपलब्ध झाल्यास कंत्राटी उमेदवाराच्या पदस्थापनेत बदल करुन देण्याचे अधिकार आयुक्त यांना राहतील.

२. उमेदवारांचे कामकाज समाधानकारक नसल्यास,गंभीर स्वरुपाची अनियमितता व गैरवर्तणुक या कारणासाठी त्याची नियुक्ती पुर्वसुचनेशिवाय संपुष्टात येईल.

३. करार पध्दतीने नियुक्त उमेदवाराने प्रस्थापित मानकांनुसार अध्यापन,रुग्णसेवा व अधिष्ठाता यांनी नेमुन दिलेली कामे पार पाडणे आवश्यक राहील.

४. वरीलप्रमाणे विहीत कामकाज पार पाडल्यानंतर महाविद्यालयीन व रुग्णालयीन कर्तव्य व जबाबदाऱ्या विपरीत परिणाम होणार नाही याची दक्षता घेऊन उमेदवारास खाजगी वैद्यकीय व्यवसाय करण्याची मुभा राहील.

५. करार पध्दतीने नियुक्ती उमेदवारांना नियमित नियुक्तीसाठी कोणतेही हक्क राहणार नाही, तसेच सदर कालावधी कोणत्याही सेवा प्रयोजनासाठी ग्राहय धरला जाणार नाही.

६. करार पध्दतीने नियुक्त उमेदवारास त्याच्या कालावधी केवळ नैमत्तीक रजा अनुज्ञेय असतील.

७. करार पध्दतीने नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तींनी त्यांना प्राप्त होणाऱ्या कागदपत्रे/माहिती आधार सामुग्रीबाबत गोपनियता पाळणे आवश्यक राहील.

८. करार पध्दतीने नियुक्ती करण्यात आलेल्या व्यक्तींना कोणत्याही प्रकारचे प्रशासकीय व वित्तीय अधिकार प्रदान करता येणार नाहीत.

९. उमेदवारास नियुक्ती देण्यात आल्यानंतर किमान एक शैक्षणीक सत्र संपेपर्यंत त्यास कोणत्याही परिस्थितीत सेवा सोडता येणार नाही, तशा आशयाचे शपथपत्र उमेदवारास नियुक्तीपुर्वी सादर करणे बंधनकारक असेल, असे शपथपत्र सादर करणाऱ्या उमेदवारासच करार पध्दतीने नियुक्ती देण्यात येईल. शैक्षणीक सत्र चालु असलेल्या कालावधीत विद्यार्थीहीत विचारात घेता उमेदवारांचा राजीनामा कोणत्याही परिस्थित स्वीकारल्या जाणार नाही.

१०. उमेदवारांचे दिनांक.२५.११.२०२६ रोजी पर्यंतचा अनुभव प्रमाणपत्र ग्राहय धरण्यात येईल.

११. बिगर सेवानिवृत्त गटातुन करार पध्दतीने नियुक्त होणाऱ्या अध्यापकांची नंतरच्या काळात नियमित नियुक्ती झाल्यास त्याला पुर्वीच्या सेवेचे कोणतेही लाभ अनुज्ञेय असणार नाहीत.

पुढील पानावर...

...मागील पानावरुन

१२. अर्जदाराने संबधित पदासाठी शारीरीकदृष्टया पात्र असल्याचे वैद्यकीय प्रमाणपत्र सादर करावे.

१३. सदर जाहीरात मधील नमुद पदसंख्या बदल करणे/सदरची जाहीरात पुर्णत: रद्द करण्याचा अधिकार अधिष्ठाता स्वत:कडे राखुन ठेवला आहे.

१४. नमुद रिक्त पदाच्या संख्येत बदल करणे बाबतचे सर्व अधिकार अधिष्ठाता यांना राहतील.

१५. अर्जदाराने त्यांच्या निवडीसाठी समितीवर प्रत्यक्ष अप्रत्यक्षरित्या कोणत्याही प्रकारचा दबाब आणल्यास त्यास निवड प्रक्रीयेतुन बाद करण्यात येईल.

१६. अर्जदारांचे नाव महाराष्ट्र वैद्यकीय मंडळ अधिनियम १९६५ च्या अंतर्गत कायम नोंदणी केल्याबाबतचे प्रमाणपत्र किंवा भारतीय वैद्यकीय परिषदेचे कायम नोंदणी प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य आहे.

१७. उमेदवारांना मुलाखतीसाठी स्वखर्चाने उपस्थित रहावे लागेल.

१८. मुलाखतीला येताना उमेदवारांनी Email (gmcparbhani@gmail.com)पध्दतीने सादर केलेल्या सर्व दस्ताऐवजांचे मुळ कागदपत्रे सोबत आणणे बंधनकारक राहील.

डॉ.विश्वजीत पवार
अधिष्ठाता
शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,परभणी

अधिष्ठाता
शासकीय वैद्यकीय महाविद्यालय
परभणी

प्रत,

अ. मा.आयुक्त (वै.शि),संचालनालय वैद्यकीय शिक्षण व संशोधन,मुंबई यांना माहितीस्तव सविनय सादर.

आ. मा.संचालक,वैद्यकीय शिक्षण व संशोधन मुंबई यांना माहितीस्तव सविनय सादर.